Samarpan
Multi Disability Rehab Center

# OCTOBER 2025



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

धुळयात प्रथमच Multi-Disability Rehab Centre सुरू झाले आहे, जिथे शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच इतर विकलांग असलेल्या मुलांसाठी विशेष उपचार व मार्गदर्शन उपलब्ध होईल. आधुनिक सुविधा, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि संपूर्ण पुनर्वसन सेवा येथे मिळणार.. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल !



**Partner Organisation**

Rotaract Club of Dhulia District-3060
Rotary Club of Dhulia District-3060
Matruseva Sangh Trust Dhule
Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust
KamalUdwadia Foundation
Vidya Vikas Child Neuroclinic

8010895177 | 02562236182 | 02562313903 www.samarpanrehab.org

Partner Organisation



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## ओळख

समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता यावं, हीच खरी सामाजिक प्रगतीची खूण आहे. प्रत्येक मुलांमध्ये मध्ये असलेल्या क्षमतेची, गरजेची आणि हक्कांची जाणीव समाजाला असावी, ही काळाची गरज बनली आहे. याच विचारातून ‘समर्पण मल्टी-डिसॅबिलिटी रिहॅब सेंटर’ ची संकल्पना उभी राहिली. धुळे शहरात प्रथमच अशा प्रकारचे केंद्र सुरू आहे. जिथे शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच बहुविकलांग मुलांसाठी सर्वसमावेशक सेवा एकत्रित स्वरूपात उपलब्ध झाले आहे.

या केंद्रामध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणांची सोय, अनुभवी आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, तसेच प्रशिक्षित थेरपिस्ट्स व पुनर्वसन तज्ज्ञांचे मार्गदर्शन आहे. येथे फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, मानसोपचार सेवा, समुपदेशन, डे-केअर सेवा आणि शैक्षणिक मार्गदर्शन अशा विविध उपचार व सहाय्यक सेवा एकाच छताखाली दिल्या जातात. यामुळे गरजू मुलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना एकात्मिक आणि सातत्यपूर्ण उपचारपद्धतीचा लाभ मिळत आहे.

‘समर्पण’ केंद्र केवळ उपचार देणारे स्थळ नाही, तर समावेशक समाज घडवणारी एक चळवळ आहे. इथे दिव्यांग मुलांना केवळ मदत मिळत नाही, तर त्यांच्यात आत्मभान, आत्मविश्वास आणि समाजात स्वतःचं स्थान निर्माण करण्याची प्रेरणा दिली जाते. त्यांच्या विकासाच्या प्रवासात त्यांचे कुटुंबही सक्रिय सहभागी व्हावे यासाठी पालकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरेही आयोजित करण्यात येत असतात.

हे केंद्र म्हणजे समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे. समतेची भावना, समजूतदार दृष्टिकोन आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचा संगम म्हणजेच ‘समर्पण’. या केंद्राच्या माध्यमातून आपण एक समावेशक, संवेदनशील आणि सशक्त समाज उभा करण्याच्या दिशेने निश्चितच पुढे जात आहोत.

## सुविधा

- फिजिओथेरपिस्ट
- ऑक्युपेशनल थेरपिस्ट
- मानसशास्त्रीय मूल्यांकन
- समुपदेशन
- रेमेडियल एज्युकेशन
- स्पीच थेरपिस्ट
- पेडियाट्रिक न्युरोलॉजिस्ट
- ईईजी
- स्पेशल एज्युकेटर्स
- पालक समुपदेशन



Partner Organisation

Rotaract Club of Dhulia | Rotary Club of Dhulia | Matruseva Sangh Trust Dhule | Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust | KamalUdwadia Foundation | Vidya Vikas Child Neuroclinic

# SAMARPAN


## Muilti Disability Rehab Centre Dhule



## ऑक्टोबर महिन्यातील आकडेवारी

**खाली दिलेली संख्या ही ऑक्टोबर महिन्यात वेगवेगळया विभागांनी तपासलेल्या रुग्णांची एकूण माहिती दर्शवते.**

| विभाग | बीपीएल सेशन्सची संख्या | नॉन बीपीएल सेशन्सची संख्या | पॅकेज | एकूण सेशन्स |
|---|---|---|---|---|
| फिजिओथेरपी | ७० | ३३ | २३ | १२६ |
| ऑक्युपेशनल थेरपी | ७१ | ५६ | ३१ | १५८ |
| स्पीच थेरपी | ० | ० | ० | ० |
| पालकांचे समुपदेशन | १ | ३ | ० | ४ |
| विशेष शिक्षण | ११ | ४ | ४८ | ६३ |
| एकूण एकत्र सेशन्स | **१५३** | **९६** | **१०२** | **३५१** |



Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## ऑक्टोबर २०२५ देणगीदार यादी

१) रोटरी क्लब ऑफ धुळे (२०२४-२५)
(अध्यक्ष: राहुल कुलकर्णी / सचिव: दीपक आहिरराव) - ₹७९,००० /-
**एकूण देणगी - ३,००,००० /- वर्ष २०२४ - २५**

२) रोटेरियन विजय चंदक, आपल्या मातोश्री सुमनताई घिर्धरिलाल चंदक यांच्या वाढदिवसानिमित्त. - ₹११,००० /-

३) चंपाबेन तनेजा (शुभम कॉम्प्युटर्स) - ₹११,००० /-







For More Information at
www.samarpanrehab.org

Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Matruseva Sangh Trust Dhule · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## ऑक्टोबर 2025 पासून उपलब्ध नवीन आधुनिक सेवा Virtual Reality ( VR )










१३ ऑक्टोबर २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ धुळे यांच्या वतीने डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन अमरदीप ब्युनेट आणि कमलजीत ब्युनेट यांनी समर्पण मल्टी डिसॅबिलिटी रिहॅब सेंटरला भेट दिली. या भेटीदरम्यान सेंटरच्या कार्याची, उपक्रमांची आणि प्रगतीची माहिती सविस्तर देण्यात आली. कार्यक्रमात डिस्ट्रिक्ट गव्हर्नर व्हिजिट प्रोग्रॅम अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पालकांसाठी PARENT INTERACTION SESSION चे आयोजन करण्यात आले, ज्याचे नेतृत्व प्राजक्ता पिंगळे यांनी केले. यावेळी MISSION आणि VISION STATEMENT चे अनावरण करण्यात आले. तसेच टीव्ही युनिटचे उद्घाटन (दाते - पी.पी. आशिष अग्रवाल) आणि VIRTUAL REALITY ROOM चे उद्घाटन (CSR सहकार्य - PEHEL FOUNDATION) डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांच्या हस्ते झाले.

या वेळी समर्पण केंद्र व RCC टीम (अध्यक्ष मनीषा कुलकर्णी) यांनी केंद्राची संकल्पना, उद्दिष्टे आणि आतापर्यंतची वाटचाल सादर केली. दात्यांचा सत्कार तसेच पालक व थेरपिस्ट यांचे अनुभवही यावेळी शेअर करण्यात आले. या भेटीद्वारे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांनी केंद्राच्या कार्याचे कौतुक करत, विशेष गरजा असलेल्या मुलांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांचे अभिनंदन केले.



Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Matruseva Sangh Trust Dhule · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## ऑक्टोबर महिन्यातील वाढदिवस विशेष

### नील वाढदिवस














Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia

Rotary Club of Dhulia

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Matruseva Sangh Trust Dhule

Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

# चला, भावी पिढीसाठी सर्व समावेशक समाज निर्माण करण्यासाठी आजच योगदान ...

**प्रत्येक मुलाला सन्मानाने,**
**आत्मविश्वासाने आणि समान संधींसह जगण्याचा हक्क आहे.**
**दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊ या**
**समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.**

QR कोड स्कॅन करून आपण देणगी देऊ शकता...



## दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊया समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.

For More Information at
www.samarpanrehab.org

Samarpan
Multi Disability Rehab Center

Partner Organisation
Rotaract Club of Dhulia District-3060
Rotary Club of Dhulia District-3060
Matruseva Sangh Trust Dhule
Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust
KamalUdwadia Foundation
Vidya Vikas Child Neuroclinic

# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule



## Partner Organisation

Rotaract Club of Dhulia District-3060

Rotary Club of Dhulia District-3060

Matruseva Sangh Trust Dhule

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Vidya Vikas Child Neuroclinic

## Digital Partner

**Saikala Bahuuddeshiya Sanstha, Dhule**

SAIKALA
BAHUDDESHIY SANSTHA

# धन्यवाद

8010895177 | 02562236182 | 02562313903

www.samarpanrehab.org

samarpan.mdrc@gmail.com

पत्ता - समर्पण मल्टी डिसएबिलिटी रिहॅब सेंटर,
कस्तुरबा हॉस्पिटल,मुख्य टपाल कार्यालयासमोर,
टॉवर बाग शेजारी, धुळे - ४२४००१

